दाखल दि.: ०३/०१/२०१८
नोंदणी दि.: ०३/०१/२०१८
निकाल दि.: ०५/०९/२०१९
कालावधी: ०१व. ०८म. ०२दि.

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, दारव्हा यांचे न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी : अ. आ. ढोके)**

**किरकोळ फौ. अर्ज क्र.०१/२०१८** **निशाणी क्र.: २३**
CNR : MHYA070000252018

अर्जदार :— १) इशरत खानुम शोएब खान,
वय २३ वर्षे, व्यवसाय : घरकाम,

२) अलीना खान शोएब खान,
वय २ वर्ष, व्यवसाय : काही नाही.
अर्जदार क्र.२ अज्ञान पालनकर्ती आई
अर्जदार क्र.१ मार्फत.
दोघेही रा. जामा मस्जीद वार्ड, दारव्हा,
ता. दारव्हा, जि. यवतमाळ.

**—: विरूध्द :—**

गैरअर्जदार :— शोएब खान मुस्तफा खान,
वय अं. २८ वर्षे, धंदा : खाजगी नोकरी.
रा. टोली चौकी, न्यु हकीमपेठ,
मस्जी—ए—घोसीया रऊफ, ९—४—५९/१११,
हैद्राबाद.

**फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम १२५ अन्वये अर्ज.**

---

**अर्जदारांतर्फे वकील : श्री. मजहर खान.**
**गैरअर्जदारतर्फे वकील : श्री. एस.ए.राजगुरू.**

---

## न्यायनिर्णय
## ( दिनांक ०५ सप्टेंबर, २०१९ रोजी )

१. सदरचा अर्ज गैरअर्जदाराविरुध्द फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५ अन्वये पोटगी मिळण्याकरिता दाखल केलेला आहे.

२. **अर्जदारांचे थोडक्यात असे म्हणणे आहे की :—**

अर्जदार क्र.१ हिचे लग्न दिनांक २१/०४/२०१३ रोजी मुस्लीम रितीरिवाजाप्रमाणे गैरअर्जदारासोबत यवतमाळ येथे संपन्न झाला. त्यानंतर ती नांदायला गेली असता काही दिवसातच लग्नामध्ये हिरो होंडा मोटारसायकल मिळाली नाही या कारणावरून गैरअर्जदाराने तिला त्रास दयायला सुरूवात केली व अश्लील भाषेत शिवीगाळ करून मारहाण करून दहा हजार रूपयाची मागणी केली. ती मागणी तिने पूर्ण केल्यामुळे काही दिवस तिला चांगले वागविले व त्यानंतर गैरअर्जदाराच्या नातेवाईकांच्या भडकविण्यामुळे गैरअर्जदार तिला खूप शारीरिक व मानसिक त्रास देवू लागले. अर्जदार क्र.१ ही गरोदर असतांना तिच्याकडून हुंडयाची मागणी करून गर्भपात करण्यासाठी दबाव आणला. जून २०१३ मध्ये गैरअर्जदाराने तिला तिच्या आईवडिलांकडे नेवून दिले व ‘‘जोपर्यंत तुम्ही हिरो होंडासाठी पैसे देत नाही तोपर्यंत तुमच्या मुलीला पाठवायचे नाही’’ असे सांगितले. त्यानंतर अर्जदार क्र.१ हिची गैरअर्जदाराने दिलेल्या त्रासामुळे शारीरिक परिस्थिती एकदम कमजोर झाली असल्याने तिचा गर्भपात झाला.

३. अर्जदारांचे पुढे असेही म्हणणे आहे की, गर्भपात झाल्याची बाब जेव्हा गैरअर्जदाराला सांगितली तेव्हा त्याने असे सांगितले की, ''चांगले झाले व तु आता हिरो होंडा मोटारसायकल घेवून ये नाहीतर येवू नको.'' गैरअर्जदाराने पैसे न मिळाल्यामुळे त्याने अर्जदार क्र.१ हिला घटस्फोटाची धमकी देवून दुसरे लग्न करणार अशी सुद्धा धमकी दिली. त्यामुळे दिनांक ०४/११/२०१३ रोजी तिने गैरअर्जदार व त्याच्या नातेवाईकांविरूद्ध भा.दं.वि.चे कलम ४९८अ, ५०६, ३४ अंतर्गत पोलीस स्टेशनला तक्रार दिली तेव्हा दिनांक २४/०१/२०१४ रोजी शंभर रूपयाच्या स्टॅम्प पेपरवर चांगल्या वागणुकीचे हमीपत्र लिहून घेवून अर्जदार क्र.१ ही गैरअर्जदारासोबत हैद्राबाद येथे नांदावयास गेली. त्या दरम्यान तिला मुलगी अर्जदार क्र.२ जन्मास आली. परंतु मुलगी जन्माला आली या कारणावरून गैरअर्जदार याने त्याच्या नातेवाईकासोबत संगनमत करून तिला त्रास देणे सुरू केले व ऑगस्ट २०१६ मध्ये इन्नोव्हा कार घेण्याकरिता पुन्हा पैशाची मागणी केली. ती मागणी पूर्ण न केल्याने गैरअर्जदाराने तिला मारहाण करून तिच्या भावासोबत घराबाहेर हाकलून दिले.

४. अर्जदारांचे पुढे असेही म्हणणे आहे की, गैरअर्जदाराने हाकलून दिल्यानंतर ती तिच्या काकाकडे राहत असून त्यांच्या दयेवर हालाखीचे जीवन जगत आहे. तिला उदरनिर्वाहाचे कोणतेही साधन नसून तिला कोणताही कामधंदा येत नाही. ती पूर्णत: गैरअर्जदारावर अवलंबून असून गैरअर्जदार हा हैद्राबाद येथे कार कंपनीमध्ये खाजगी नोकरी करून दर माह रूपये २५,०००/— कमवितो व तो तिचा व तिच्या मुलीचा उदरनिर्वाह करण्यास सक्षम आहे. त्यामुळे तिने प्रत्येकी रूपये ५,०००/— खावटी मिळण्याची विनंती केली.

५. गैरअर्जदाराने त्याचे लेखी उत्तर निशानी क्र.१७ वर दाखल करून अर्जदार व गैरअर्जदार यांचे नातेसंबध मान्य करून इतर सर्व मजकूर नाकारला. गैरअर्जदारांचे थोडक्यात असे म्हणणे आहे की, दिनांक २१ एप्रिल २०१३ रोजी लग्न झाल्यानंतर अर्जदार ही नांदावयास आली असता तिची वागणूक गैरअर्जदार व त्याच्या नातेवाईकांप्रती चांगली नव्हती. ती तिच्या आईवडिलांची एकुलती एक मुलगी असल्याने लाडाची होती व नेहमी गैरअर्जदार व त्याच्या आईवडिलांना उद्धटपणे उलटसुलट बोलत होती. लहानपणापासूनच अर्जदार ही सुखात राहिल्यामुळे तिला घरातील कामे करणे जीवावर येत होते. तिची तब्येत नाजूक असल्याने तिला घरातील कोणतेही जड काम देण्यात येत नसून नेहमी तिला गैरअर्जदाराने अत्यंत प्रेमाने व आपुलकीने वागविले व ती सुंदर असल्याने नेहमी तिला फुलासारखे जपण्याचा प्रयत्न केला.

६. गैरअर्जदाराचे पुढे असेही म्हणणे आहे की, अर्जदार हिला एकत्र कुटुंबात राहायचे नसल्याने तिने वेगळे राहण्याचा गैरअर्जदारास तगादा लावला. अशातच अर्जदार हिला दिवस राहिले असता लवकर मुल नको गर्भ पाडून टाकतो असे तिने व तिच्या आईवडिलांनी गैरअर्जदाराला म्हटले व त्याने नकार दिला असता त्याच्यासोबत भांडण केले. अर्जदार ही कुठलेही कारण नसतांना तिच्या माहेरी यवतमाळ येथे राहत होती व तिने खावटीकरिता किरकोळ फौजदारी प्रकरण ०१/२०१४ न्यायालयात दाखल केले ज्यामध्ये आपसी समझोता झाल्यानंतर ती हैद्राबादला गैरअर्जदारासोबत नांदावयास आली व गैरअर्जदारापासून तिला अलीना मुलगी झाली. सर्व काही व्यवस्थित सुरू असतांना अर्जदार हिने गैरअर्जदाराला एक लाख रूपयाची मागणी केली त्याबाबत गैरअर्जदाराने विचारणा केली असता तिने काही एक उत्तर न देता गैरअर्जदारासोबत भांडण केले व

दिनांक २९/०८/२०१६ रोजी गैरअर्जदाराला काहीही न सांगता मुलीला घेवून तिच्या भावासोबत माहेरी सर्व कपडे, दागदागिने, नगदी रक्कम, इत्यादि घेवून निघून आली.

७. गैरअर्जदाराचे पुढे असेही म्हणणे आहे की, अर्जदार ही स्वतःहून घर सोडून निघून आली त्यामुळे दिनांक ०३/१०/२०१६ रोजी नांदावयास येण्याचा नोटीस त्याने पाठविला. परंतु तो नोटीस घेण्यास अर्जदार हिने नकार दिला व गैरअर्जदार व त्याच्या नातेवाईकांविरूद्ध कौटुंबिक हिंसाचार कायदा अंतर्गत पी.डब्ल्यू.डी.व्ही.ए. अर्ज क्र.४४/२०१६ दाखल केला त्यामध्ये दिनांक १५/०१/२०१८ रोजी निकाल लागला असून अर्जदार व तिच्या मुलीला दर माह प्रत्येकी रूपये १,०००/— खावटी तसेच दर माह रूपये ७००/— घरभाडे व रूपये १०,०००/— नुकसान भरपाई मंजूर झाले आहे. गैरअर्जदार तिला नांदविण्यास तयार असून तो मजुरीचे काम करीत असल्याने व त्याच्यावर त्याच्या म्हाताऱ्या आईवडिलांची जबाबदारी असल्याने तो अर्जदार हिला खावटी देवू शकत नाही. अर्जदार ही यवतमाळ येथील खाजगी रूग्णालयात नर्स म्हणून नोकरी करीत आहे त्यामुळे तिने केलेली खावटीची मागणी मिळण्यास ती पात्र नाही. त्यामुळे तिचा अर्ज खारीज करण्याची विनंती केली.

८. दोन्ही पक्षांचे म्हणणे लक्षात घेता खालील मुद्दे निश्चित करुन त्यावरील कारणमिमांसा निष्कर्षासह नोंदविण्यात येत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष.** |
|---|---|---|
| १) | अर्जदार सिध्द् करतात काय की, गैरअर्जदाराने त्यांचे पालनपोषण करण्यास नकार दिला किंवा टाळाटाळ केली? | होय. |

| | | |
|---|---|---|
| २) | अर्जदार हे सिध्द् करतात काय की, गैरअर्जदाराकडे उत्पन्नाचे पुरेसे साधन आहे? | होय. |
| ३) | अर्जदार हे सिध्द करतात काय की, त्या स्वत:चा उदरनिर्वाह करण्यास असमर्थ आहेत? | होय. |
| ४) | अर्जदार हया निर्वाह रक्कम मिळण्यास पात्र आहेत काय?<br>असल्यास किती ? | होय.<br>रू.१५००/— व रू.८००/— प्रती माह अनुक्रमे अर्जदार क्र.१ व २ करिता. |
| ५) | आदेश काय? | अर्ज अंशत: मंजुर. |

## **कारणमिमांसा**

९. प्रस्तुतच्या अर्जातील वस्तुस्थिती व विंनती सिद्ध करण्याकरिता अर्जदार इशरत हिने स्वत:ला निशानी क्र.९ वर तपासले व निशानी क्र.१९ नुसार तिने तिची पुराव्याची बाजू बंद केली. याउलट, गैरअर्जदाराला वारंवार संधी देवून सुद्धा त्याने या प्रकरणात कोणताही तोंडी अथवा कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केला नाही. निशानी क्र.२१ प्रमाणे पुरसीस दाखल करून गैरअर्जदाराला पुरावा दयावयाचा नाही असे त्याने न्यायालयाला कळवले.

१०. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. अर्जदाराचे विद्वान वकील साहेब श्री. मजहर खान यांनी त्यांच्या अर्जाप्रमाणे व अभिलेखावर आलेल्या पुराव्यानुसार युक्तीवाद केला. याउलट, गैरअर्जदाराचे विद्वान वकील साहेब श्री. एस. ए. राजगुरू यांनी गैरअर्जदाराने दाखल केलेले उत्तर व अर्जदार हिने तिच्या पुराव्यातील उलट—तपासणीमध्ये दिलेल्या कबुली न्यायालयाच्या निदर्शनास आणून त्याप्रमाणे युक्तीवाद केले.

**मुद्दा क्र.१ करिता** :—

११. अर्जदार क्र.१ व अर्जदार क्र.२ यांचे गैरअर्जदारासोबतचे नाते याबद्दल कोणताही वाद नाही. अर्जदाराच्या पुराव्यानुसार, गैरअर्जदाराने लग्न झाल्यानंतर काही दिवसातच हिरो होंडा मोटारसायकल मिळाली नाही या कारणावरून तिला अश्लील भाषेत शिवीगाळ करून मारहाण करून त्रास दिला व दहा हजार रूपयाची मागणी केली. ती मागणी पूर्ण केल्यानंतर त्याने तिला काही दिवस चांगले वागविले व त्यानंतर पुन्हा त्रास दयायला सुरूवात केली. तिच्या पुराव्यावरून असेही दिसून येते की, गैरअर्जदाराच्या शारीरिक व मानसिक त्रासाला कंटाळून तिने त्याची व त्याच्या नातेवाईकांची पोलीस स्टेशनला रिपोर्ट दिली परंतु दिनांक २४/०१/२०१४ रोजी त्यांच्यात समझोता होवून शंभर रूपयाच्या स्टॅम्प पेपरवर हमी पत्र लिहून घेवून ती नांदायला गेली व त्या दरम्यान तिला मुलगी जन्मास आली परंतु मुलगी जन्मास आली या कारणावरून पुन्हा गैरअर्जदाराने तिला त्रास देणे सुरू केले. तसेच ऑगस्ट २०१६ मध्ये इन्नोव्हा कार घेण्याकरिता पैशाची मागणी केली. तिने पैसे देण्यास असमर्थता दर्शविल्याने तिला मारहाण करून तिच्या भावासोबत गैरअर्जदाराने घराबाहेर हाकलून दिले व तेव्हापासून ती तिच्या माहेरच्या लोकांच्या दयेवर हालाखीचे जीवन जगत आहे.

१२. पुढे तिच्या पुराव्यावरून असे दिसून येते की, ती माहेरी असतांना तिला किंवा अर्जदार क्र.२ च्या पालनपोषणाकरिता गैरअर्जदाराने काहीही मदत पुरविली नाही व ती तिचा व तिच्या मुलीचा उदरनिर्वाह करण्यास असमर्थ आहे. सदर अर्ज दाखल केल्यापासून दरम्यानच्या काळात गैरअर्जदाराने अर्जदारांना कसलीही मदत केली नाही. तिचा पुरावा खोडून काढण्याकरिता गैरअर्जदाराचे विद्वान वकील साहेब यांनी अर्जदाराची सखोल उलट—तपासणी घेतली. परंतु तिच्या पुराव्यावर संशय निर्माण होईल अशी कोणतीही बाब अभिलेखावर आणली नाही. गैरअर्जदाराने जरी त्याच्या लेखी उत्तर निशानी क्र.१७ मध्ये अर्जदार ही स्वमर्जीने माहेरी राहते असे जरी कथन केले असले तरी ते सिद्ध करण्याकरिता कोणताही कागदोपत्री अथवा तोंडी पुरावा त्याने अभिलेखावर दाखल केला नाही. तसेच अर्जदार हिच्या उलट—तपासणीमध्ये सुद्धा अशी कुठलीही बाब आणलेली नाही ज्यावरून असा अनुमान काढता येईल की, ती स्वमर्जीने तिच्या माहेरी राहत आहे. येथे नमूद करण्यासारखी बाब म्हणजे भारतीय संस्कृतीमध्ये कोणतीही स्त्री विनाकारण आपल्या पतीचे घर सोडून माहेरी राहत नाही त्यामुळे अर्जदाराची साक्ष ही विश्वसनीय दिसून येते. त्यामुळे मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी नोंदविण्यात येते.

**मुद्दा क्र.२ करिता** :

१३. अर्जदार हिने तिच्या अर्जात व पुराव्यात सांगितले आहे की, तिला उत्पन्नाचे कोणतेही साधन नसून गैरअर्जदार हा हैद्राबाद येथे कार कंपनीमध्ये खाजगी नोकरी करतो व तो दर माह रूपये २५,०००/— कमवितो. परंतु तिने तिच्या उलट—तपासणीमध्ये गैरअर्जदाराच्या कामकाजाबाबत तिने कागदपत्रे दाखल केली

नसल्याचे सांगितले. अभिलेखाचे अवलोकन केले असता गैरअर्जदाराचे उत्पन्न दाखवणारे कोणतेही कागदपत्र अर्जदाराने दाखल केल्याचे दिसून येत नाही. अशा परिस्थितीत जरी गैरअर्जदाराचे निश्चित उत्पन्न अभिलेखावर नसले तरी गैरअर्जदार हा सुदृढ शरीराचा व्यक्ती असून त्याच्यावर त्याच्या पत्नीचे व मुलीचे पालनपोषण करण्याची नैतिक जबाबदारी आहे. तसेच त्याने त्याच्या लेखी उत्तरामध्ये तो मजुरीचे काम करत असल्याचे सांगितले आहे. त्यामुळे त्याच्याकडे उत्पन्नाचे साधन असल्याचे दिसून येते. त्यामुळे मी मुद्दा क्र.२ चे उत्तर होकारार्थी नोंदवितो.

**<u>मुद्दा क्र.३ करिता</u>** :

१४. मी मुद्दा क्र.२ चे उत्तर होकारार्थी नोंदविले आहे. अर्जदाराने तिच्या अर्जात व पुराव्यात असे सांगितले आहे की, तिला उत्पन्नचे कोणतेही साधन नसून ती स्वतःचा व तिच्या मुलीचा सांभाळ करण्यास पूर्णपणे असमर्थ आहे. यासंबंधाने तिने तिच्या उलट—तपासणीमध्ये सर्व प्रतीकूल सूचना नाकारल्या. गैरअर्जदाराने त्याचे लेखी उत्तर निशानी क्र.१७ मध्ये जरी असे कथन केले असले की, अर्जदार ही बी.एस्सी. झाली असून यवतमाळ येथील खाजगी रूग्णालयात नर्स म्हणून नोकरी करते त्यामुळे खावटी मिळण्यास ती अपात्र आहे. परंतु हे सिद्ध करण्याकरिता त्याने अभिलेखावार कोणताही कागदोपत्री पुरावा दिलेला नाही त्यामुळे अर्जदार हिला उत्पन्नाचे साधन आहे किंवा काय हे सिद्ध करण्यास गैरअर्जदार माझ्या मते अपयशी ठरलेला आहे. म्हणून मी या निष्कर्षास पोहोचलो आहे की, अर्जदार हिला उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. म्हणून मी मुद्दा क्र.३ चे उत्तर होकारार्थी नोंदवितो.

**मुद्दा क्र.४ करिता** :

१५. मी मुद्दे क्र.१ ते ३ चे उत्तर होकारार्थी नोंदविले आहे. गैरअर्जदाराचे निश्चित उत्पन्न जरी दिसून येत नसले तरी तो मजुरीचे काम करीत असल्याचे त्याने त्याच्या लेखी उत्तरात सांगितले आहे. गैरअर्जदाराने त्याचे लेखी उत्तर निशानी क्र.१७ मध्ये असे कथन केले आहे की, अर्जदार हिने पी.डब्ल्यू.डी.व्ही.ए. अर्ज क्र.४४/२०१६ नुसार प्रकरण दाखल केले असून त्यामध्ये दिनांक १५/०१/२०१८ रोजी न्यायनिर्णय घोषित करण्यात आला असून त्यानुसाार दर माह प्रत्येकी रूपये १,०००/— खावटी व दर माह रूपये ७००/— घरभाडे व रूपये १०,०००/— नुकसान भरपाई मंजूर करण्यात आली आहे. निशानी क्र.१२ प्रमाणे अर्ज दाखल करून अर्जदार हिने दस्तऐवज यादी निशानी क्र.१३ प्रमाणे पी.डब्ल्यू.डी.व्ही.ए. अर्ज क्र.४४/२०१६ मधील पारित झालेल्या आदेशाची प्रमाणीत प्रत दाखल केली आहे. येथे विचारात घेण्याजोगी बाब म्हणजे अर्जदार हिने तिच्या अर्जात व पुराव्यात सदर प्रकरण दाखल केल्याबाबत व त्यामध्ये पारित झालेल्या न्यायनिर्णयाबाबत काहीही उल्लेख केलेला नाही. तिला व तिच्या मुलीला दर माह रूपये १,०००/— पोटगी व रूपये ७००/— घरभाडे मिळत असतांना तिने या अर्जामध्ये प्रत्येकी ५,०००/— खावटी मिळण्याची विनंती केली आहे.

१६. अर्जदाराने अर्ज दाखल करतांना अर्जामध्ये सर्व महत्वाचे तथ्य न्यायालयासमोर मांडणे गरजेचे आहे. परंतु अर्जदार हिने कौटुंबिक हिंसाचार कायदयानुसार तिला व तिच्या मुलीला खावटी मिळत असल्याची बाब तिच्या अर्जात व पुराव्यात सांगितली नाही. या अनुषंगाने तिच्याविरूद्ध प्रतीकूल अनुमान काढण्यात येवून

तिने मागणी केल्याप्रमाणे प्रत्येकी रूपये ५,०००/— दर माह पोटगी मिळण्यास ती माझ्या मते पात्र नाही. परंतु कौटुंबिक हिंसाचार कायदा व कलम १२५ फौजदारी प्रक्रिया संहिता यानुसार दाखल केलेल्या प्रकरणांचे स्वरूप भिन्न असल्याने जरी अर्जदार हिला व तिच्या मुलीला कौटुंबिक हिंसाचार कायदयानुसार पोटगी मिळत असली तरी कलम १२५ फौजदारी प्रक्रिया संहितेनुसार पोटगी मागण्याचा तिला अधिकार नाही असे म्हणता येणार नाही. असे असले तरी कौटुंबिक हिंसाचार कायदयानुसार मिळत असलेली पोटगी ही या अर्जानुसार पोटगी ठरवितांना विचारात घेणे योग्य होईल. अभिलेखावरून असे दिसून येते की, पी.डब्ल्यू.डी.व्ही.ए. अर्ज क्र.४४/२०१६ नुसार एकूण रूपये २,७००/— दर माह अर्जदारांना देण्याचे आदेश गैरअर्जदाराविरूद्ध पारित झालेले आहे. परंतु अर्जदार व तिची मुलगी यांचा सामाजिक दर्जा, मूलभूत गरजा व राहणीमान याचा विचार करता अर्जदार क्र.१ हिला दर माह रूपये १,५००/— व अर्जदार क्र.२ हिला दर माह रूपये ८००/— एवढी रक्कम देणे योग्य होईल. त्यामुळे मी मुद्दा क्र.४ चे उत्तर अंशतः होकारार्थी नोंदवितो.

**<u>मुद्दा क्र.५ करिता</u>** :

१७. मी मुद्दे क्र.१ ते ३ चे उत्तर होकारार्थी नोंदविले असून मुद्दा क्र.४ चे उत्तर अंशतः होकारार्थी नोंदविले आहे. त्यामुळे मुद्दा क्र.५ च्या उत्तरादाखल मी खालील आदेश पारित करीत आहे.

## आ दे श

१) अर्ज अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

२) गैरअर्जदाराने अर्जदार क्र.१ हिला रुपये रु. १,५००/— (एक हजार पाचशे) फक्त दर महा पोटगी व अर्जदार क्र.२ हिला रूपये ८००/— (आठशे) फक्त दर महा पोटगी असे एकूण रूपये २,३००/— (दोन हजार तीनशे) फक्त दर माह अर्ज दाखल तारखेपासून दयावेत.

३) अर्जदारांना न्यायनिर्णयाची प्रत विनामूल्य देण्यात यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायदालनात घोषित करण्यात आला.)

Digitally signed by Avinash Anandrao Dhoke
Date: 2019.09.05 16:55:13 +0530

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

( अ.आ ढोके )

दिनांक : ०५/०९/२०१९

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
दारव्हा